दि. २१/०७/२०२२.      प्रकरण क्रं.   :— ५७०/पीडब्ल्यू/२०१८
                                  निशाणी क्रं.  :— १८

साक्षीदार क्रं.    :— १
माझे नाव        :— संतोष तुकाराम धाडवे.
वय              :— ४० वर्षे.  कामधंदा :— खाजगी नोकरी.
सध्या राहणारा  :— नलासोपारा (प), मुंबई.

<u>सरतपास स.स.अभियोक्ता श्री गवळी यांच्या मार्फत</u>

सरकारी वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर आढळून आले.  सबब साक्षीदाराची साक्ष त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी हा न्यायाधीन बंदी आहे.  आरोपीला आज न्यायालयासमक्ष हजर केले नाही.  घटना दि.०४/०८/२०१८ रोजी, दादर रेल्वे स्टेशनवर फलाट क्र.१ वर रात्री नऊ दहा वाजताच्या सुमारास घडली होती.  घटनेच्या दिवशी मी माझ्या कामानिमित्त मालाड येथे दादर रेल्वे स्टेशन येथील फलाट क्र.१ वर मी गेलो होतो.  त्यावेळी मी लोकलमध्ये चढत असताना आरोपीने माझ्या शर्टच्या खिशामध्ये असलेला माझा मोबाईल काढला.  त्यावेळी मी चोर—चोर म्हणून ओरडलो असता आरोपी पळून गेला.  त्यावेळी त्या ठिकाणी लोकांची गर्दी जमा झाली होती.  त्यावेळी पोलीसांनी त्याला पकडले.

२.  त्यानंतर आम्ही आरोपीला घेवून दादर रेल्वे स्टेशन येथील पोलीस चौकीमध्ये गेलो त्यानंतर त्या ठिकाणावरून एक पोलीस कॉन्स्टेबल, मी स्वत: व आरोपी मुंबई सेंट्रल लोहमार्ग पोलीस ठाणे येथे आलो.  त्या ठिकाणी पोलीसांनी संगनकावर रितसर माझी तक्रार

नोंदवून घेतली. आता मला सदरची तक्रार दाखविली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला (नि. क्र.१९) देण्यात येत आहे. आता मला छापील प्रथमवर्दी अहवाल दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला (नि. क्र.२०) देण्यात येत आहे. त्यानंतर परत पोलीसांनी माझा जबाब घेतला नाही. या व्यतिरिक्त माझ्या समक्ष कोणतीही कारवाई झाली नाही. या व्यतिरिक्त मला काहिही सांगायचे नाही.

सरतपास संपला.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री हरिष व्होरा यांच्यामार्फत

३. ज्यावेळेला मी दादर रेल्वे स्टेशन येथील फलाट क्र.१वर आलो त्यावेळी त्या ठिकाणी इतर प्रवाशांची गर्दी होती, हे म्हणने खरे आहे. मी ज्यावेळेस कम्पार्टमेंटमध्ये चढत होतो त्यावेळेस प्रवाशांची गर्दी होती, परंतू गर्दी कमी होती. मी कम्पार्टमेंटमध्ये चढत असताना माझे लक्ष चढण्याकडे होते, हे म्हणने खरे आहे. मी चढत असताना माझ्या आजूबाजूला असलेला इतर प्रवाशीदेखील कम्पार्टमेंटमध्ये चढण्यासाठी प्रयत्न करत होते, हे म्हणने खरे आहे. लोकलमध्ये चढत असताना प्रवाशांच्या गर्दीमध्ये एकमेकांना एकमेकांचा हात लागतो, हे म्हणने खरे आहे.

४. दि.०४/०८/२०१८ रोजी, मी लोकल ट्रेनमध्ये चढत असताना आरोपीने माझ्या शर्टच्या खिशातून मोबाईल काढण्यासाठी हात टाकला नव्हता, हे म्हणने खरे नाही. आरोपीला दादर रेल्वे

दि. २१/०७/२०२२.    प्रकरण क्रं.   :— ५७०/पीडब्ल्यू/२०१८

स. सा. क्र.१    निशाणी क्रं.   :— १८ पुढे

स्टेशन येथील फलाट क्र.१ वर पकडले नव्हते, हे म्हणने खरे नाही. मी आरोपी विरूध्द खोटी फिर्याद दाखल केली, हे म्हणने खरे नाही.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
स्वाक्षरी/—
(भा. कि. गावंडे)

दि. २१/०७/२०२२.    महानगर दंडाधिकारी, ३६वे न्यायालय,
सराद.    मुंबई सेंट्रल, मुंबई.